# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/04/2023 (बुधवार) सकाळ


---

## सराईत गुन्हेगार कुलदीप लखनसिंग बावरी व मयुर उर्फ एन. डी. कृष्णाजी राऊत यांना MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबध्द

### (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

पोलीस स्टेशन बुट्टीबोरी अंतर्गत येणाऱ्या रूईखैरी परीसरात राहणारे सराईत गुन्हेगार **कुलदीपसिंग लखनसिंग बावरी वय २७ वर्ष व मयुर उर्फ एन. डी. कृष्णाजी राऊत वय २९ वर्ष दोन्ही रा. रूईखैरी ता. जि. नागपूर** हे मागील काही वर्षापासून रूईखैरी व बुट्टीबोरी परिसरात गुंडगिरी करुन तेथील नागरिकांना त्रास देत होते. ते नेहमी गुन्हेगारी कृत्यात गुंतलेले असायचे त्यांनी रूईखैरी, बुट्टीबोरी, एमआयडीसी बुट्टीबोरी व नागपूर शहर परिसरात चोरी, घरफोडी, जबरी चोरी, जबरी चोरी करून दुखापत करणे, कट रचुन खुन करून त्याचा पुरावा नष्ट करणे, महिलांना फुस लावुन पळवुन नेवुन त्यांचेशी जबरी संभोग करणे, दुखापत करून लोकांना जिवे मारण्याची धमकी देणे व स्वत:जवळ प्राणघातक शस्त्रे जवळ बाळगुन गंभीर दुखापती पोहचविणे यासारखे गुन्हे करण्याच्या सवयीचे आहेत. त्यांच्या असामाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये ते आपले स्वत:ची भीती निर्माण करुन दहशत पसरवित होते. नागपूर ग्रामीण पोलीसांना त्यांचेविरुध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवून त्या दोघांचेही विरूद्ध गुन्हे नोंद करून त्यांना अटक करुन कारागृहात पाठविले आहे. परंतु **कुलदीपसिंग लखनसिंग बावरी वय २७ वर्ष व मयुर उर्फ एन. डी. कृष्णाजी राऊत वय २९ वर्ष दोन्ही रा. रूईखैरी ता. जि. नागपूर** यांचे गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा झालेली नाही. त्यामुळे त्यांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्यांचेविरूद्ध प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु त्यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरुच ठेवली. त्यांचे कृत्य सामाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण कडुन MPDA कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दि. १२/०४/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी **कुलदीपसिंग लखनसिंग बावरी वय २७ वर्ष व मयुर उर्फ एन. डी. कृष्णाजी राऊत वय २९ वर्ष दोन्ही रा. रूईखैरी ता. जि. नागपूर** यांचे विरुध्द स्थानबध्दता आदेश काढला असुन त्यानुसार त्यांना मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे १ वर्षाकरीता स्थानबध्द केले आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले , उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर श्रीमती पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, श्री. भिमाजी पाटील, ठाणेदार पो.स्टे. बोरी, पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, पोलीस हवालदार दिनेश आधापूरे, निलेश बर्वे, विजय डोंगरे, संजय बांते यांनी पार पाडली.

# मौजा गोंडखैरी येथील अवैद्य देशी दारू अड्डयावर धाड
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई :—

दिनांक ११/०४/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभागात गस्त करीत असतांना पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील मौजा गोंडखैरी येथे काका सावजी धाब्यावर विनोद कृष्णराव पोहनकर नावाचा इसम हा त्याचे धाब्यावर अवैधरित्या बिनापरवाना देशी दारू बाळगुन विक्री करीत असल्याची गोपनिय माहीती पथकास प्राप्त झाले वरून सदर पथकाने सापळा रचुन छापा टाकला असता **आरोपी नामे— विनोद कृष्णराव पोहनकर, वय ५३ वर्ष, रा. श्रीकृष्ण नगर दत्तवाडी जि. नागपूर** याचे ताब्यात १८० एम.एल च्या एकुण ५६ नग देशी दारूच्या निपा, एकुण किंमती ३९२०/—रूपयाचा मुद्देमाल अवैधरित्या बिनापरवाना मिळुन आल्याने सदर मुद्देमाल त्याचे ताब्यातुन जप्त करून आरोपी विरूध्द अप. क्र. २५४/२३ कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीस जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे कळमेश्वर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस ठाणे कळमेश्वर करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस हवालदार निलेश बर्वे, दिनेश अधापुरे यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर